**महाराष्ट्र शासन**

**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**

**जुने जिल्हा परिषद भवन, त्र्यंबक नाका, पोस्ट ऑफिस शेजारी, नाशिक - 422001**

**दुरध्वनी क्र. 0253-2977374** **Email- mahakumbhanashik@gmail.com**

जा.क्र.नात्र्यंकुंप्रा/प्राधिकरण निधी बैठक-फेब्रु-02/2026 दि.स्वाक्षरीखाली नमूद

प्रति,

1 मा.जिल्हाधिकारी, नाशिक.
2 मा.जिल्हाधिकारी, अहिल्यानगर.
3 मा.महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
4 मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
5 मा.पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण.
6 मा.आयुक्त, महानगरपालिका, नाशिक.
7 मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.
8 मा.मुख्यधिकारी, त्र्यंबक नगरपरिषद
9 मा.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
10 मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक.
11 मा.विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक.
12 मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक.
13 मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, देवळाली कंन्टोंमेंट, नाशिक.
14 मा.अधिक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक.
15 मा.अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण.
16 मा.कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक.
17 मा.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक.
18 मा.जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक.
19 मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक.
20 मा.सहायक संचालक, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग, नाशिक.
21 मुख्यधिकारी, शिर्डी नगरपालिका
22 मा.रेल्वे मंडळाचे प्रतिनिधी.

**विषय : नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची दिनांक 17/02/2026 रोजी मा.अध्यक्षतेखाली झालेल्या सिंहस्थ कुंभमेळा बैठकीचे इतिवृत्त.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सिंहस्थ कुंभमेळा 2026-27 प्राधिकरणाची दि.17/02/2026 मा.अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात येऊन संपन्न झालेली आहे.

सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत असून मा. अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक महोदय यांचे सूचनेनुसार सदर इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

Digitally signed by
Yogendra Ashok Chaudhari
Date: 02-03-2026 17:22:25

**( योगेंद्र चौधरी )**
**उपायुक्त (नियोजन)**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण.**
**नाशिक**

बैठकीस उपस्थितांची यादी

| | |
|---|---|
| १ | जिल्हाधिकारी, नाशिक. |
| २ | पोलीस आयुक्त, नाशिक शहर |
| ३ | पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण. |
| ४ | आयुक्त, महानगरपालिका, नाशिक. |
| ५ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक. |
| ६ | मुख्यधिकारी त्र्यंबक नगरपरिषद |
| ७ | विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक |
| ८ | अधिक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक. |
| ९ | मुख्य अभियंता , सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक. |
| १० | अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक |
| ११ | मुख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक. |
| १२ | अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण. |
| १३ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक. (यांचे प्रतिनिधी ) |
| १४ | सह संचालक,लेखा व कोषागार विभाग, नाशिक |
| १५ | कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक. |
| १६ | जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक. |
| १७ | जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक. (यांचे प्रतिनिधी ) |
| १८ | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक |
| १९ | मुख्य कार्यकारी अधिकारी, NMSCDCL. |
| | |

**नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची दि.17/02/2026 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

दि.17/02/2026 रोजी डॉ. श्री. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा व प्राधिकरणाची बैठक घेण्यात आली. बैठकीत उपस्थितांची यादी सोबत संलग्न आहे. कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव यांनी सर्व प्राधिकरण सदस्यांचे स्वागत केले आणि बैठकीला सुरुवात झाली.

**विषय क्र.1 :- दि.30.01.2026 रोजीचे बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा आयुक्त यांनी दि.30/01/2026 रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताला मान्यता देण्याबाबत सर्व प्राधिकरण सदस्यांना विनंती केली त्यानुसार प्राधिकरणाने घेतलेल्या दि.30/01/2026 रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्ताला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.2:-नाशिक ग्रामीण – कुंभमेळा सन 2026-27 च्या अनुषंगाने कायदा, शांतता, सुव्यवस्था आणि गर्दी व वाहतुक नियंत्रण तसेच सुरक्षितता उपाययोजना या अनुषंगाने कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांनी कुंभमेळा कालावधीत कायदा, शांतता, सुव्यवस्था आणि गर्दी व वाहतुक नियंत्रण तसेच सुरक्षिततेच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर केला. याबाबत मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांचे अध्यक्षतेखाली दि.08.11.2025 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्ता मधील मु.क्र.5 नुसार नाशिक शहर व ग्रामीण पोलिसांमार्फत सादर करण्यात आलेले आराखडे मा. प्रधान सचिव (विशेष) गृहविभाग यांच्या मार्फत छाननी करण्यात येऊन त्यानंतर प्रशासकीय मान्यतेसाठी नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणास सादर करण्यात यावेत असे नमूद आहे. यानुसार प्राधिकरणाचे कार्यालयाने दि.24.11.2025 रोजी मा. प्रधान सचिव (विशेष) गृहविभाग, यांना पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचा सुमारे रु. 364.28 कोटी व पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांचा सुमारे रु.415.24 कोटीचा आराखडयास अंतिमीकरणासाठी पाठविण्यात आला. त्यानुषंगाने सदर प्रस्तावास मा. अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली दि.04.12.2025 रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आल्याचे कुंभमेळा आयुक्तांनी नमूद केले आहे. तसेच याबाबतची सविस्तर चर्चा शासन स्तरावर गृह विभागात झाली असून संपूर्ण आराखडे इत्यादींची आवश्यकतेनुसार व तांत्रिक दृष्ट्या छाननी शासन स्तरावर झाली आहे आणि त्यामुळे प्राधिकरण स्तरावर झालेली नाही असेही त्यांनी स्पष्ट केले व त्यानुसार प्रशासकीय मान्यता देण्यासाठी पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांनी प्रस्तावांबाबत माहिती सादर केली.

यावर मा. अध्यक्ष महोदयांनी विचारणा केली की, सदर प्रस्तावांपैकी कुठल्या प्रस्तावांना तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली आहे व सदर प्रस्तावांमध्ये काही कामे अशी निदर्शनास आली आहे काय की ज्या कामांची इतर विभागाकडून व्दिरुक्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा पोलीस अधिक्षक यांनी सदर प्रस्तावित कामांची व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल, तसेच काही कामांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मान्यता प्राप्त आहे व इतर कामांना पोलीस महासंचालककाकडून मान्यता प्राप्त होण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे असे नमूद केले. सबब ज्या कामांना तांत्रिक मान्यता प्राप्त आहे त्या कामासाठी प्राधिकरणामार्फत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत मान्यता देण्यात आली.

सदर प्रस्तावातील खालील नमूद कामे / बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

| अ. क्र. | कामे /बाबींची | प्रती / नग | रक्कम | झालेली चर्चा व दिलेले निर्देश |
|---|---|---|---|---|
| 1 | सिंहस्थ कुंभमेळा 2026-2027 च्या बंदोबस्तासाठी येणारे पोलीस अधिकारी/अंमलदार यांची राहण्याची व्यवस्था करणेसाठी गोरक्षा ट्रस्ट, तुपादेवी फाटा जागेमध्ये पोलीस कॅम्प उभारणे आवश्यकआहे. कुंभमेळा बंदोबस्ताकरिता अंदाजे 20,000 पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे निवास व्यवस्था करिता पायाभूत सुविधेसह दुरुस्ती आवश्यक आहे. | **दुरुस्ती** 22 **बॅरेक** 04 **रेस्ट हाउस** | 11,25,00,000 | गोरक्षा ट्रस्ट, तुपादेवी फाटा येथील अस्तित्वातील जागा आणि बांधकामांचा वापर करून, त्यात आवश्यक ती दुरुस्ती आणि तात्पुरती बांधकामे करून पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे करिता निवास व्यवस्था करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यास तांत्रिक मान्यता उपलब्ध असल्याचे कुंभमेळा आयुक्तांनी नमूद केले. त्यानुसार सदर कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली. |
| 2 | सिंहस्थ कुंभमेळा 2026-2027 च्या बंदोबस्तासाठी येणारे पोलीस अधिकारी / अंमलदार यांची राहण्याची व्यवस्था करणेसाठी गोरक्षाट्रस्ट, तुपादेवीफाटा, व श्री. लड्डा यांचे जागेमध्ये पोलीस कॅम्प उभारणे आवश्यकआहे. कुंभमेळा बंदोबस्ताकरिता अंदाजे 20,000 पोलीस अधिकारी व अंमलदारयांचे निवास व्यवस्थाकरिता पायाभुत सुविधेसह नवीन तात्पुरत्या बॅरेक, नवीन रेस्टहाउस आवश्यक आहे. | **नवीन तात्पुरत्या बॅरेक** 40 **बॅरेक** 01 **रेस्ट हाउस** | 80,35,00,000 | याबाबत या ठिकाणी गोरक्षा ट्रस्ट, तुपादेवी फाटा आणि श्री. लड्डा यांच्या जागेमध्ये पोलीस कॅम्प उभारणे आवश्यक आहे व कुंभमेळा बंदोबस्ताकरिता अंदाजे २० हजार पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे निवास व्यवस्थेबाबतचा हा प्रस्ताव आहे अशा स्वरूपाची माहिती पोलिस अधीक्षक यांच्याकडून देण्यात आली. तसेच याबाबतची तांत्रिक मान्यता उपलब्ध असल्याचे कुंभमेळा आयुक्त यांनी सांगितले. त्यावर या आधीच्या आणि या प्रस्तावात एकत्रित मिळून एकूण चाळीस हजार व्यक्तींची निवासव्यवस्था होत असल्याचे अध्यक्षांनी निदर्शनास आणून दिले व स्थळाबद्दलही व्दिरूक्ती असल्याचे निदर्शनास आणून दिले. तरी सदरचे कामकाज करताना एकंदरीत प्रस्तावित कर्मचारी संख्या प्रमाणेच आणि कामाची व्दिरूक्ती होणार नाही या प्रकारे आणि केवळ तात्पुरत्या स्वरूपाची व्यवस्था होईल, कायम स्वरूपी बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घेत कामाची निविदा काढावी अशा सूचना अध्यक्षांनी दिल्या. त्या अटीवर प्रस्तावित कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. |
| 3 | सी.सी.टी.व्हीकॅमरे, इतर सर्व साधनसामुग्रीसह-1100 कॅमेरे पी. ए. सिस्टीम भोंगे ऍम्लीफायर, माईक इ. सह | 1100 | | सदरची कामे नाशिक स्मार्ट सिटी मार्फत कामात अंतर्भूत असल्याचे कुंभमेळा आयुक्त यांनी सांगितले. याला आता पुन्हा वेगळ्याने |

| अ. क्र. | कामे /बाबींची | प्रती / नग | रक्कम | झालेली चर्चा व दिलेले निर्देश |
|---|---|---|---|---|
| | 1316 हॉर्न व 146 ठिकाणे ड्रोन कॅमेरे - 08 सिक्युरिटी सर्व्हेलन्स सिस्टीम | | | प्रशासकीय मान्यता देण्याची गरज नाही असे ठरले. |
| 4 | बिनतारी संदेश विभागासाठी लागणारी107 साधनसामुग्री | ------ | 10,59,64,300 | सदर कामांची तांत्रिक मान्यता अप्राप्त आहे. ती प्राप्त होताच प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात येतील, असे कुंभमेळा आयुक्तांनी सांगितले. तसेच याबाबत आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित निधी उपलब्ध होऊ शकतो का हेही तपासून पाहायचे ठरले. |
| 5 | बॉम्बशोध नवनाशक पथक 36 साहीत्य साधन सामुग्री खरेदीसाठी | ------ | 13,07,96,400 | |
| 6 | नवीन वाहन खरेदी | 235 **वाहने** | 12,91,50,000 | सदर खरेदीस सहायक पोलीस महानिरिक्षक (नि.व.स.) पोलीस महासंचालक कार्यालयाने तांत्रिक मान्यता देतांना जिल्हानियोजन समितीकडून उपलब्ध होणाऱ्या निधीतून खरेदी करण्याबाबत निर्देशप्राप्त आहेत. तरी सदरपत्रात जिल्हानियोजन समिती कडील निधी / कुंभमेळा निधी अशी सुधारणा प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय मान्यता देणे शक्य होईल. |
| 7 | वाहने भाडयाने घेणे (24 तासासाठी, ड्रायव्हर, इंधनासह)) | 349 **वाहने** | 13,05,01,000 | सदर कामावर होणारा खर्च हा दिनांक 15.06.2027 ते दि.30.09.2027 दरम्यान उद्भवणाऱ्या कामांवर करण्यात येईल या अटीस राहून मान्य. |
| 8 | 5000 होमगार्ड यांना ने-आण करणे कामी बस भाडयाने घेणे | 125 **बस** | 1,12,00,000 | |
| 9 | इंधनखर्च | ------ | 2,00,00,000 | |
| 10 | स्पेअरपार्ट | ------ | 50,00,000 | |
| 11 | कायम स्वरुपी वॉचटॉवर 9,50 लाख 01 वॉचटॉवरची किंमत | 10 | 95,00,000 | यापैकी क्रमांक 12,15,16 वरच्या कामाला तांत्रिक मान्यता अप्राप्त असून उर्वरित कामांना तांत्रिक मान्यता प्राप्त असल्याचे कुंभमेळा आयुक्त यांनी निदर्शनास आणले. तांत्रिक मान्यता प्राप्त असलेल्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. |
| 12 | तात्पुरते वॉचटॉवर 6 लाख 01 वॉचटॉवरची किंमत | 20 | 1,20,00,000 | |
| 13 | बॅरीकेटींग-स्टील 10000नग प्रति किंमत-25000 | 10000 **नग** | 25,00,00,000 | |
| 14 | बॅरीकेटींग-मोजो3000नग प्रति किंमत-23000 | 3000 **नग** | 6,90,00,000 | |
| 15 | बल्ली बॅरेकेटींग एकुण 90 रु किमी रनिंगफुट - 100 किमी रनिंग फुट प्रमाणे 100000 X90 = 9000000 जीएसटी सह 9000000 X 3 पर्वणी= 27000000 X 3 दिवस | 100 **KM** | 2,70,00,000 | |
| 16 | वॉटर बॅरीकेटींग | **5 KM** | 2,50,00,000 | |
| 17 | मंगल कार्यालय /लॉन्स (सर्व सोयीयुक्त ) 24 तासासाठी | 60 | 9,75,00,000 | पोलीस विभागामार्फत ढोबळ अंदाजपत्रक तयार करून प्रस्ताव सादर झालेला आहे प्रत्यक्ष खर्च |

| अ. क्र. | कामे /बाबींची | प्रती / नग | रक्कम | झालेली चर्चा व दिलेले निर्देश |
|---|---|---|---|---|
| | प्रतिदिवस 25000 भाडे व 65 दिवसांसाठी भाडयाने घेण्यासाठी | | | करताना नियमानुसार ठरेल त्याप्रमाणे खर्च करण्याच्या अटीस अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदरचे मंगल कार्यालय / लॉन्स बुक करण्यासाठी आवश्यक तो अग्रिम (20 % बयाना रक्कम) देण्यासही मान्यता देण्यात येत आहे. |
| 18 | सिंहस्थ कुंभमेळा 2026-27 चे बंदोबस्तासाठी 20000 पोलीस अधिकारी /अंमलदार /एसआरपीएफ /होमगार्ड /स्वयंसेवकयांना चहा, जेवणाकरिता सकाळचा चहा, नाश्ता, दुपारचे जेवण, संध्याकाळचे जेवण पाणी बॉटलसाठी प्रतिव्यक्ती 600/- याप्रमाणे अंदाजित करण्यात आली आहे (65 दिवसांसाठी) | 20000 **पोलीस अधिकारी / अंमलदार** | 78,00,00,000 | सदरची आवश्यकता, दर इत्यादी गृह विभाग आणि पोलीस महासंचालक कार्यालयाकडून निश्चित करण्यात आले आहेत, त्यानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. |
| 19 | पुर्वतयारी बंदोबस्तासाठी 1000 पोलीस अंमलदार यांना जेवण 600/-याप्रमाणे 35 दिवसांसाठी | 1000 **पोलीस अधिकारी/ अंमलदार** | 2,10,00,000 | |
| 20 | 20000 पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेसाठी मेडीकल कीट प्रतिकिट-1000 | 20000 | 2,00,00,000 | |
| 21 | रेनकोट प्रति किट—1200 | 20000 | 2,40,00,000 | सदर कामांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येतआहे. तथापि दि.31.10.2026 पावेतो सीएसआर निधी प्राप्त झाल्यास प्राधान्याने सीएसआर निधीतुन खर्च करणे आवश्यक राहील. अन्यथा विहितप्रक्रियेचा अवलंबकरुन संबंधीत कार्यालयाने खरेदी प्रक्रिया राबवावी. |
| 22 | स्वयंसेवकांनाटी - शर्ट 2 नग प्रति -500 | 2000 | 20,00,000 | |
| 23 | 20000 पोलीस बंदोबस्ता करीता जीवनावश्यक वस्तु व हाउसकिपींग खर्च | 20000 | 9,71,50,000 | सदरची आवश्यकता, दर इत्यादी गृह विभाग आणि पोलीस महासंचालक कार्यालयाकडून निश्चित करण्यात आले आहेत, त्यानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. |
| 24 | कंटेनर पोलीस चौकी प्रतिनग-20लाख | 20 | 4,00,00,000 | सदर कामांसाठी तांत्रिक मान्यता प्राप्त झाली झाली आहे. तसेच सदर बाबी विकत घेतल्यास कुंभमेळ्यात नाशिक, त्र्यंबकेश्वर येथे आणि त्यानंतर राज्यात विविध पोलीस युनिट्स मध्ये |
| 25 | कायमस्वरुपी पोलीस चौकी प्रतिनग- 23लाख | 10 | 2,30,00,000 | |

| अ. क्र. | कामे /बाबींची | प्रती / नग | रक्कम | झालेली चर्चा व दिलेले निर्देश |
|---|---|---|---|---|
| 26 | तात्पुरते पोलीस चौकी प्रतिनग- 6लाख | 30 | 1,80,00,000 | वापरण्याच्या दृष्टीने भाड्याने घेण्यापेक्षा त्या विकत घेणे योग्य राहील असे पोलिस अधीक्षक यांनी नमूद केले. त्यानुसार मान्यता देण्यात येत आहे. |
| 27 | पोर्टेबल पोलीस चौकी, प्रतिनग- 3लाख | 50 | 1,50,00,000 | |
| 28 | प्लास्टीक खुर्ची, प्रतिनग- 700रु | 5000 | 35,00,000 | |
| 29 | नविन राहुटया खरेदी, प्रतिनग- 65000रु | 125 | 70,00,000 | |
| 30 | शामियाने 15 X 30 मिटर | 25 | 23,75,000 | |
| 31 | सोशल मिडीया लॅब | 1 | 3,60,00,000 | सदर कामाची कोणत्याही विभागामार्फत व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच फसवणूक व गुन्ह्यांशी संबंधीत व इतर पोलीस विभागाशी संबंधीत बाबींचा समावेश करावा. तसेच सक्षम अधिकाऱ्याकडून तांत्रिक मान्यता प्राप्त करुन प्रस्तावित करण्यात यावे. |
| 32 | कार्यालयीन खर्च | ------ | 5,00,00,000 | सदरचे खर्च हे ढोबळमानाने नमूद केले असून त्याबाबत कुंभमेळ्याशी निगडित बाबी निदर्शनास येत नाहीत याची एकदा खात्री करावी. तसेच जो कार्यालयीन खर्च सर्व विभागांना कुंभमेळ्यासाठी देण्यात येईल त्याचीच मागणी करावी व त्यानुसार प्रस्ताव सादर करावा. |
| 33 | ईमरजन्सी मॅनेजमेंट आणि मॅनपावर | ------ | 7,00,00,000 | |
| 34 | 20000 पोलीस अधिकारी, अंमलदार ,होमगार्ड यांना देण्यात येणारेप्र शिक्षण | 20,000 | 5,00,00,000 | **मान्य** |
| 35 | स्मार्ट टेक्नॉलॉजी चा वापर | ------ | 2,00,00,000 | सदर कामाची कोणत्याही विभागामार्फत व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच फसवणूक व गुन्ह्यांशी संबंधीत व इतर पोलीस विभागाशी संबंधीत बाबींचा समावेश करावा. तसेच सक्षम अधिकाऱ्याकडून तांत्रिक मान्यता प्राप्त करुन आगामी बैठकीत प्रस्तावित करण्यात यावे. |
| 36 | मुख्य नियंत्रण कक्ष (पोलीस मुख्यालय नाशिक ग्रामीण) | 1 | 25,72,38,407 | सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक येथे स्मार्ट सिटी कार्यालयात मुख्य ICCC प्रस्तावित आहे. तसेच शहर पोलिसांसाठी, पोलीस आयुक्त कार्यालयात आणि ग्रामीण पोलिसांसाठी त्र्यंबकेश्वर येथील पोलीस स्टेशन / उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात ICCC प्रस्तावित आहे. चौथ्या नियंत्रण कक्षाच्या |

| अ. क्र. | कामे /बाबींची | प्रती / नग | रक्कम | झालेली चर्चा व दिलेले निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | | | आवश्यकतेबाबत पुन्हा एकदा खात्री करणे योग्य राहील. |
| 37 | ऑडीटोरिअम 250 आसन क्षमतेचे | 1 | 4,00,00,000 | नवीन ऑडिटोरियम बांधण्यापेक्षा शहरात मध्यवर्ती ठिकाणी असणारी खाजगी अथवा महानगरपालिकेचे ऑडिटोरियम वापरणे योग्य राहील असे अध्यक्षांनी नमूद केले. |
| 38 | त्र्यंबकेश्वर पोलीस ठाणे 5 मजली बहुउद्देशीय इमारत- तांत्रिक मान्यतेनुसार कामे पोलीस ठाणे व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, सर्व फर्निचरसहीत, क्षमतेचे रेस्ट रुम, भोजन कक्ष वरिष्ठ अधिका-यासांठी १२ सुट रुमै सर्व फर्निचरसहीत, अस्तित्वातील बॅरेक्स इमारती मध्ये दुरुस्ती व इमारती वरती नविन अतिरिक्त मजला व सर्व इमारतींमध्ये फर्निचर | 1 | 51,73,75,000 **(तांत्रिक मान्यतेनुसार रुपये** 54,17,12,369) | पोलीस स्टेशन बांधकामासाठी रुपये 51 कोटी पेक्षा अधिक निधी प्रस्तावित आहे याबाबतचा सविस्तर आराखडा उपलब्ध नाही. याची खात्री शासन स्तरावर झाल्याचे कुंभमेळा आयुक्तांनी स्पष्ट केले. तथापि प्रस्तावित रकमेची बाब पाहता याबाबत मानकानुसार व आवश्यकतेनुसार पुन्हा एकदा खात्री करावी. आर्थिक सारासार (Financial Prudence) व गरजेनुसार आराखड्यात आवश्यक ते बदल करून निविदा प्रसिद्ध करावी या अटीवर प्रशासकीय मान्यता देण्यात आली. |
| 39 | मा. विशेष पोलीस महानिरीक्षक नाशिक परिक्षेत्र नाशिक कार्यालयाच्या मोकळयाजागेत डोमशेड बांधणे. | 1 | 1,77,85,000 | कुंभमेळा निधीतून विविध विभागांमार्फत करण्यात येणाऱ्या ज्या ज्या कामांना मान्यता देणे आवश्यक आहे. त्याबाबतचे निकष ठरवून ही सर्व कामे प्रस्तावित करावी. |
| 40 | मा. विशेष पोलीस महानिरीक्षक नाशिक परिक्षेत्र नाशिक कार्यालय येथील कॉन्फरन्स हॉलचे नुतनीकरण करणे | 1 | 49,72,000 | |
| 41 | 20000 पोलीस अधिकारी, अंमलदार गमबुट | 20000 | 2,00,00,000 | **मान्य** |
| 42 | राज्य गुप्तवार्ता विभाग,नाशिक घटक | ------ | 3,63,00,000 | **मान्य** |
| | एकुण | | 4,11,13,07,107 | |
| | क्वॉलीटी कंट्रोल@1% | | 4,11,13,071 | |
| | **एकुण एकंदर** | | 4,15,24,20,178 | |

सबब, प्राधिकरणाच्या वतीने मान्य असलेल्या रक्कम रु.313,17,38,369/- रुपयांचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तसेच मा.प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग यांचे मार्फत मंजुर करण्यात आलेल्या रकमेच्या मर्यादेत उर्वरीत प्रस्ताव दिलेल्या निर्देशानुसार सादर करण्यात यावेत.

**विषय क्र. 3:-नाशिक शहर – कुंभमेळा सन 2026-27 च्याअनुषंगाने कायदा, शांतता, सुव्यवस्था आणि गर्दी व वाहतुक नियंत्रण तसेच सुरक्षितता उपाययोजना याअनुषंगाने कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..**

पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांनी कुंभमेळा कालावधीत कायदा, शांतता, सुव्यवस्था आणि गर्दी व वाहतुक नियंत्रण तसेच सुरक्षिततेच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर केला. याबाबत मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांचे अध्यक्षतेखाली दि.08.11.2025 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तामधील मु.क्र.5 नुसार नाशिक शहर व ग्रामीण पोलीसामार्फत सादर करण्यात आलेले आराखडे मा. प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग यांच्या मार्फत छाननी करण्यात येऊन त्यानंतर प्रशासकीय मान्यतेसाठी नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणास सादर करण्यात यावेत असे नमूद आहेत. यानुसार प्राधिकरणाचे कार्यालयाने दि.24.11.2025 रोजी मा.प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग, यांना पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचा सुमारे रु.364.28 कोटी व पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांचा सुमारे रु.415.24 कोटीचा आराखडयास अंतीम करणासाठी पाठविण्यात आला. त्यानुषंगाने सदर प्रस्तावास मा.अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली दि.04.12.2025 रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आल्याचे नमूद केले आहे. असे कुंभमेळा आयुक्त यांनी नमूद केले व त्यानुसार प्रशासकीय मान्यता देण्यासाठी पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांनी प्रस्तावांबाबत माहिती सादर केली.

पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांनी काही कामांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मान्यता प्राप्त आहे व इतर कामांना पोलीस महासंचालकांकडून मान्यता प्राप्त होण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. सबब ज्या कामांना तांत्रिक मान्यता प्राप्त आहे त्या कामासाठी प्राधिकरणामार्फत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत मान्यता देण्यात आली.

सदर प्रस्तावातील खालील नमुद कामे / बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

| **कामाचा प्राधान्य क्रम** | | **कामाचे नाव** | **एकुण संख्या** | **एकुण रक्कम** | **झालेली चर्चा व दिलेले निर्देश** |
|---|---|---|---|---|---|
| | | **बांधकाम/राहण्याची व्यवस्था** | | | |
| 1 | A | **जुने बांधकाम** दुरुस्ती (6,042मनुष्यबळाकरीता) | 24 | 22,62,50,000/- | **मान्य** |
| | B | **इतर विभागाकडील इमारती भाडेतत्वावर**(2,970 मनुष्यबळकरीता) | 05 | 4,51,00,000/- | **मान्य** |
| | C | **मंगलकार्यालय/ लॉन्स, लॉज, धर्मशाळा भाडयाने घेणे** (21,863 हजार मनुष्यबळ) 30,157मनुष्यबळ निवास व्यवस्था (2361अधिकारी+27796मनुष्यबळ) | 163 | Market Rate- 52,26,82,000/- | पोलीस विभागामार्फत ढोबळ अंदाजपत्रक तयार करून प्रस्ताव सादर झालेला आहे प्रत्यक्ष खर्च करताना नियमानुसार ठरेल त्याप्रमाणे खर्च करण्याच्या अटीस अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदरचे मंगल कार्यालय / लॉन्स बुक करण्यासाठी आवश्यक तो अग्रिम देण्यासही मान्यता देण्यात येत आहे. |
| | | | **एकुण रक्कम** | 79,40,32,000/ | |

| कामाचा प्राधान्य क्रम | कामाचे नाव | | एकुण संख्या | एकुण रक्कम | झालेली चर्चा व दिलेले निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| 2 | **A** | भोजन व्यवस्था – पोलीस अधिकारी,अंमलदार व सेवक यांना बंदोबस्तावेळी जेवण (पर्वणीच्या वेळी 7 दिवस 33460 मनुष्यबळ) | 33460 | 11,71,10,000/- | **मान्य** |
| | **B** | **मेस (पुर्ण सिंहस्थ कुंभमेळा कालावधी** 58 दिवस 30157 मनुष्यबळ करीता) टिप-मेस व्यवस्था असल्याने D.A. आकारणी होणार नाही. | 30157 | 87,45,53,000/- | **मान्य** |
| | | **एकुण रक्कम** | | 99,16,63,000/ | |
| 3 | | बाहय पोलीस बंदोबस्ताकरीता जीवनावश्यक वस्तु व सेवा खर्च(हाऊसकिपींग, बाथरुम साहित्य, गिझर, पिण्याचे पाणीजार, स्पायकर्स, मोबा. टॉयलेट्स) | 30157 | 42,13,00,000/- | **मान्य** |
| | | **एकुण रक्कम** | | 42,13,00,000/ | |
| 4 | | रेनकोट | 33460 | 3,59,60,000/- | सदर कामांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येतआहे. तथापी दि.31.10.2026 पावेतो सीएसआर निधी प्राप्त झाल्यास प्राधान्याने सीएसआर निधीतून खर्च करणे आवश्यक राहील. अन्यथा विहित प्रक्रियेचा अवलंब करुन संबंधीत कार्यालयाने खरेदी प्रक्रिया राबवावी. |
| | | स्वयंसेवकांना टि शर्ट, कॅप | 5,000 | | |
| | | **एकुण रक्कम** | | 3,59,60,000/- | |
| 5 | | **तात्पुरते स्वरुपात पोलीस हॉस्पीटल** | 01 | 3,36,00,000/- | पोलीस विभागाच्या आरोग्य विषयक गरजा या जिल्हा शल्यचिकित्सकांच्या आराखड्यात समाविष्ट करून त्यांची अंमलबजावणी त्यांच्यामार्फत करावी असे नमूद करण्यात येत आहे. |
| | | **एकुण रक्कम** | | 3,36,00,000/- | |
| 6 | | **वाहतुक व इंधन** | | | |
| | A | बंदोबस्त ने-आण करणे कामी एस.टी. / खाजगी बस तसेच वॉटर टॅकर | - | 3,51,26,300/- | सदर कामावर होणारा खर्च हा दिनांक 15.06.2027 ते दि.30.09.2027 दरम्यान |

| कामाचा प्राधान्य क्रम | | कामाचे नाव | एकुण संख्या | एकुण रक्कम | झालेली चर्चा व दिलेले निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | B | इंधन | - | 2,50,00,000/- | उद्भवणाऱ्या कामांवर करण्यात येईल या अटीस राहून मान्य. |
| | C | स्पेअर पार्टस | - | 50,00,000/- | |
| | | **एकुण रक्कम रुपये** | | **6,51,26,300/-** | |
| 7 | - | **कंटेनर पोलीस चौकी कॅम्प + स्टे** | 30 | 3,54,00,000/- | **तांत्रिक मान्यता अप्राप्त** |
| | | **एकुण रक्कम रुपये** | | **3,54,00,000/-** | |
| 8 | | **बीडीडीएस** | 35 | 11,60,20,407/- | तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यावर सादर करण्यात यावे. |
| | | **एकुण रक्कम रुपये** | | 11,60,20,407/ | |
| 9 | | **वॉचटॉवर** | 50 | 2,50,00,000/- | तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यावर सादर करण्यात यावे. |
| | | **एकुण रक्कम रुपये** | | **2,50,00,000/-** | |
| 10 | **आपत्ती व्यवस्थापन** | | | | |
| | **A) Emergency Management and Manpower Training** 33460 पोलीस अधीकारी / अंमलदार, होमगार्ड, स्वयंसेवक यांना देण्यात येणारे प्रशिक्षण फि | | 33460 | 33,46,00,000/- | प्रस्तावित रकमेची बाब पाहता याबाबत आवश्यकतेनुसार पुन्हा एकदा खात्री करावी. या अटीवर प्रशासकीय मान्यता देण्यात आली. |
| | **B) आपत्ती व्यवस्थापन साधनसामग्री** | | | 6,00,00,000/- | याबाबत आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित निधी उपलब्ध होऊ शकतो का हेही तपासून पाहायचे ठरले. |
| | **C) बिनतारी संदेश विभाग** | | 87 | 26,40,47,989/- | तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यावर सादर करण्यात यावे. |
| | **D) वाहन खरेदी** | | 55 | 15,35,81,427/- | तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यावर सादर करण्यात यावे. |
| | **E) बॅरीकेटींग** | | | | |
| | बल्ली बॅरीकेटींग | | 150 कि.मी. | 12,15,00,000/- | तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यावर सादर करण्यात यावे. |
| | स्टिल बॅरीकेटींग | | 5000 | 12,50,00,000/- | तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यावर सादर करण्यात यावे. |
| | मोझो बॅरीकेटींग | | 2,000 | 3,00,00,000/- | तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यावर सादर करण्यात यावे. |
| | **एकुण रक्कम रुपये** | | | 1,08,87,29,416/ | |
| 11 | **अनुभवी विशेष पोलीस अधीकारी मानधन** | | 50 | **शासन नियमाप्रमाणे** | |
| | **वरील अ.क्र. 01 ते 11यांची एकुण रक्कम रुपये** | | | 360,68,31,123 /- | |

| कामाचा प्राधान्य क्रम | कामाचे नाव | एकुण संख्या | एकुण रक्कम | झालेली चर्चा व दिलेले निर्देश |
|---|---|---|---|---|
| | **Quality Control** | | 3,60,68,311/- | ---- |
| | **Grand Total** | | 364,28,99,434 /- | |

सबब, प्राधिकरणाच्या वतीने मान्य असलेल्या रक्कम रु.192,35,35,700/- रुपयांचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. 4:- कुंभमेळाच्या अनुषंगाने तंत्रज्ञानात्मक दृष्टीकोन प्रभावीपणे राबविण्यासाठी माहिती तंत्रज्ञान संचालनालय (DIT), महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक ०५ ऑक्टोबर २०२३ च्या शासन निर्णयानुसार मान्यताप्राप्त सल्लागार संस्थांमधून आयटी सल्लागार नियुक्तीस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत...**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने (DIT) दिनांक०५ ऑक्टोबर २०२३रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार (GR No: GAD-IT 080/4/2014-O/O Directorate of IT-DIT (MH)), सिंहस्थ कुंभमेळा २०२७ मधील तंत्रज्ञान विषयक कामांसाठी सल्लागार संस्थांची (Consultancy Agencies) निवड करणेबाबत नाशिक कुंभमेळा या सर्वात मोठ्या धार्मिक मेळा असल्याने या कुंभमेळ्यात अंदाजे 12 कोटींहून अधिक भाविक उपस्थित राहतील असा अंदाज आहे. नाशिक—त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ हा कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ऑगमेंटेड रिॲलिटी (AR) व व्हर्च्युअल रिॲलिटी (VR) यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आतापर्यंतचा सर्वात तंत्रज्ञान-सक्षम धार्मिक मेळा ठरणार आहे. या दृष्टीकोनाची अंमलबजावणी करण्यासाठी तंत्रज्ञानाधारित उपक्रम राबविणे आवश्यक आहे. (उदा. Digital Experience & User Engagement, Safety, Security & Crowd Management, Immersive & Experiential Technologies व तंत्रज्ञान SOPs / ICCC व ICT पायाभूत सुविधा वापर प्रकरणे) यासारखी तंत्रज्ञानात्मक दृष्टीकोन प्रभावीपणे राबविण्यासाठी सदर शासन निर्णयानुसार सल्लागार संस्थांमधून आयटी सल्लागार नियुक्त करणे आवश्यक असल्याचे कुंभमेळा आयुक्त यांनी नमूद केले. तसेच सदर कामाला माहिती व तंत्रज्ञान विभागाने नगरविकास विभागामार्फत दि.13.02.2026 रोजीचे पत्रान्वये मान्यता दिलेली आहे. सदर प्रस्तावाला प्राधिकरणाच्या वतीने रु.05.00 कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.5:- त्र्यंबकेश्वर शहरातील विविध (10) आखाडयांमध्ये विकास कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

त्र्यंबकेश्वर शहारातील विविध दहा आखाडे (आनंद, अग्नी, अटल, आवाहन, बडाउदासिन, जुना, महानिर्वाण, नयाउदासिन, निरंजनी, निर्मल) सदर आखाडया मध्ये विविध सोयीसुविधा पुरविण्यासाठी यापुर्वीप्रत्येकी 1 कोटीप्रमाणे असे एकुण 10 कोटीची प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. आता सदर आराडयांना त्यांचे इमारतीशी संबंधीत कामे करण्यासाठी प्रत्येकी 1 कोटीप्रमाणे एकुण 10 कोटीचे प्रस्ताव सादर केले आहे आणि यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग ही कार्यान्वीन यंत्रणा म्हणून प्रस्तावित आहे असे कुंभमेळा आयुक्त यांनी नमुद केले. सबब, प्राधिकरणाच्या वतीने रु.10.02 कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.6:- नाशिक येथील जिल्हा परिषद जुन्या इमारतीचे कुंभमेळा कार्यालयामधील कॉन्फरन्स हॉल व वॉररूम करिता अंतर्गत ऑडीओ-विडीओ यंत्रणा उभारणी करणे आणि विद्युतीकरण, अग्निशमन यंत्रणा या कामाना प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..**

नाशिक येथील जिल्हा परिषद जुन्या इमारती चे कुंभमेळा कार्यालयामधील कॉन्फन्स हॉल व वॉररूम करिता अंतर्गत ऑडीओ-विडीओ यंत्रणा उभारणी करणे आणि विद्युतीकरण, अग्निशमन यंत्रणा या कामांचे प्रस्ताव कार्यकारी अभियंता (विद्युत) सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांनी सादर केले आहे. कुंभमेळा कार्यालयामध्ये वॉररुम, कॉन्फरन्स हॉल तसेच विद्युतीकरण, अग्नीशमन यंत्रणा इत्यादी बाबी आवश्यक असल्याचे कुंभमेळा आयुक्त यांनी नमूद केले. त्यानुसार प्राधिकरणाच्या वतीने रुपये 1.64 (कॉन्फरन्स हॉल व वॉररूम) + रुपये 1.85 (विद्युतीकरण, अग्निशमन यंत्रणा) असे एकुण रुपये 3.49 कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

तसेच वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.03.02.2026 मधे नमूद केल्यानुसार दि.15.02.2026 व त्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्यात येऊ नये असे शासन निर्देश आहेत. तथापी सदरील शासन निर्देश हे दि.31.03.2026 पर्यंत होणाऱ्या खर्चासाठी लागू आहेत व उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित प्रशासकीयमान्यते अंती कोणताही खर्च दि.31.03.2026 पावेतो होणार नसून सदरील कामे दीर्घमुदतीची असल्याने प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक असल्याची खात्री करण्यात आली आहे.

उपरोक्त प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांपैकी जी कामे शासनाचे पत्र दिनांक २९/०८/२०२५ मध्ये नमुद नाही आणि / किंवा रू.५१४०.०१ च्या मान्यतेच्या पलीकडे आहे त्या सर्व कामांबाबत नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अधिनियम २०२५ मधील तरतुदीनुसार शासनाची मान्यता घ्यावी लागेल. त्यानुसार सदर प्रस्ताव हे शासनाकडे शिखर समितीकडे कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात यावे तसेच प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करतांना झालेल्या चर्चेनुसार उचित अटी व शर्ती टाकण्याची दक्षता कुंभमेळा आयुक्त यांनी घ्यावी असे मा.अध्यक्षांनी निर्देशित केले.

कुंभमेळा आयुक्त यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून बैठक समाप्त करण्यात आली.

Digitally signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 26-02-2026 12:42:52

**(डॉ. प्रवीण गेडाम)**
**अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा**
**विभागीय आयुक्त, नाशिक.**